# काश्मीर समस्या : भारत-पाक समस्येतील मुख्य गुंता

प्रा. राजेंद्र ओ. बेलोकार
राज्यशास्त्र विभाग प्रमुख एस.एन. मोर कला, वाणिज्य व श्रीमती जी.डी. सराफ विज्ञान महाविद्यालय, तुमसर जि. भंडारा

**प्रस्तावना :-**

दक्षिण आशियामधील भारत व पाकिस्तान ही दोन मोठी व सर्वात महत्वाची राष्ट्रे म्हणून ओळखली जातात. आपल्या स्वातंत्र्यापासूनच कायमची पराकोटीच्या देशामध्ये सतत रक्तरंजीत कारवाया मध्ये गुंतलेली ही दोन राष्ट्रे पाकिस्तानच्या आडमुठेपणाच्या धोरणामुळे सतत संघर्षशिल राहिलेली दिसून येतात. भारत -पाक मधील रक्तरंजित संघर्षाच्या मागे असणारा कळीचा मुद्दा म्हणजे काश्मीर समस्या हा होय. काश्मीर समस्येने केवळ या दोन देशांमधील तणाव कायमच ठेवलेला नाही तर स्वतः काश्मीर बरोबर दक्षिण आशियाच नव्हे तर संपूर्ण जगाला तणावाचा अनुभव दिलेला आहे. अलीकडील दिड दशकाच्या व्दिपक्षीय सामरिक डावपेचातून काश्मीर मुद्दा हा अतिशय संवेदनशिल बनला आहे. या संबंध पार्श्वभूमीवर काश्मीर समस्येची नेमकी गुंतागुंत व त्यावरील दोन्ही देशांचे डावपेचात्मक आडाख्याचे विश्लेषण प्रस्तुत शोध पत्रातून करण्यात आलेले आहे.

भारतीय संघ राज्यातील २९ राज्यांपैकी जम्मू आणि काश्मीर हे एक राज्य असून त्याचे क्षेत्रफळ ८६,०२३ चौरस मैल एवढे आहे. या क्षेत्रामध्ये काश्मीरचे खोरे आणि बाल्टीस्तान ,गिलगाटे , हेजा आणि नगर हे आदीवासी क्षेत्र यांचा समावेश होतो. सध्या काश्मीरचे खोरे, जम्मूचे क्षेत्र आणि लडाख हे भारतीय अधिपत्याखाली आहे. आदीवासी क्षेत्र पाकिस्तानच्या अधिपत्याखाली आहे.काही पर्वतीय क्षेत्र पाकिस्तानमध्ये तर काही भारतात आहेत.[१] या पार्श्वभूमीवर काश्मीर समस्या ही उत्तरोत्तर अधिकच गुंतत गेल्याचे दिसून येते.

**जम्मू व काश्मीरमधील पाकिस्तानी घुसखोरी :**

एकीकडे भारताला शांतता विषयक चर्चेत गुंतवून ठेवत दुसरीकडे पाकिस्तानचा पाठिंबा असलेल्या दहशतवाद्यांनी येत्या काही दिवसांपासून शस्त्रसंधीचे उल्लंघन करीत भारतीय भागामध्ये घुसखोरी केली आहे. ताबारेषेवरील केरात सेक्टर मध्ये एकाच वेळी विविध ठिकाणांतून घुसखोरी करण्याची नवी योजना दहशतवाद्यांनी राबविली आहे. घुसखोरांना पिटाळून लावण्यासाठी हवाई दलालाही पाचारण करण्यात आले आहे. जम्मू -काश्मीरचा वाद हा आता फारच संवेदनशील विषय झाला असून त्याविषयी भारताने कडक धोरण राबविणे अत्यावश्यक बनले आहे. घुसखोरी म्हणजे बेकायदेशीररीत्या एखाद्या क्षेत्रामध्ये प्रवेश करणे, सध्या जम्मू व काश्मीर मधील घुसखोरीचा प्रश्न फारच चर्चेत आला.[२] जम्मू-काश्मिर समस्या समजून घेण्यासाठी भारत-पाकिस्तान विभाजनाचा इतिहास पाहणे आवश्यक ठरते.

भारताच्या विभाजनातून १४ ऑगस्ट १९४७ रोजी पाकिस्तान व १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. ब्रिटीशांची 'फोडा आणि झोडा' नीती, बंगालची फाळणी, १९०९ च्या कायद्यातील मुस्लिमांसाठी विभक्त मतदार संघाची तरतुद, ब्रिटीशांचे मुस्लिम लिगला समर्थन , जीनांना पाठिंबा इत्यादी. मार्गांनी धर्मावर आधारित पाकची निर्मिती झाली. पाकची निर्मितीच मुळात धर्मधिष्ठीत राजकारणातून झाली याचा परिणाम म्हणून भारत-पाक यांच्यात वैचारिक मतभेदांची दरी रुंदावत गेली.

१९४७ मध्ये पाकिस्तानने जम्मू व काश्मीरमधील काही भाग व्यापला , यालाच पाकव्याप्त काश्मीर असे संबोधले जाते. संपूर्ण जम्मू व काश्मीर राज्याचे पाकिस्तानात विलीनीकरण व्हावे अशी पाकिस्तानची इच्छा आहे. परंतु जम्मू काश्मीर संस्थानाने पाकिस्तानात सामील होण्यास नकार देऊन भारतात सामील होण्याच पर्याय स्विकारला तेव्हापासून भारत व पाकिस्तान यांच्यामध्ये जम्मू व काश्मीर बाबत वाद सुरु आहे. दोन्ही देश जम्मू व काश्मीर शिवाय स्वतःला अपूर्ण मानतात.[३] म्हणूनच जम्मू-काश्मिरचा गुंता दिवसेंदिवस वाढत चालला आहे.

भारताच्या स्वातंत्र्याबरोबरचं काश्मीरचे राज्य स्वतंत्र झाले. काश्मीरचे महाराजा हरिसिंग यांनी भारत किंवा पाकिस्तानमध्ये विलीन होण्यास नकार देत स्वतंत्र अस्तित्व टिकवून धरले. ऑक्टोंबर १९४७ मध्ये पाकिस्तानने या क्षेत्रातील काही स्थानिक जमातींच्या माध्यमातून काश्मीर क्षेत्रात घुसखोरी केली, पाकिस्तानचे हे काश्मीरवरील पहिले आक्रमण होते. राजा हरिसिंग याने भारताकडे मदतीची विनंती केली. २३ ऑक्टोंबर १९४७ रोजी राजा हरिसिंग याने भारतात काश्मीर विलीन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार भारताबरोबर २६ ऑक्टोबर १९४७ रोजी विलिनीकरणाचा करार करण्यात आला. अशाप्रकारे कश्मीर क्षेत्र भारताचा घटक बनले. भारताने घुसखोरी विरुद्ध त्वरीत लष्करी कारवाई करुन घुसखोरांना रोखले.

१ जानेवारी १९४८ रोजी भारताने संयुक्त राष्ट्र संघटनेच्या घटनेतील कलम ३५ अंतर्गत हा प्रश्न सुरक्षा समितीपुढे मांडला आणि पाकिस्तानने काश्मीरवरील आक्रमण त्वरीत माघारी घ्यावे यासाठी सुरक्षा परिषदेने हस्तक्षेप करावा अशी विनंती केली. सुरक्षा परिषदेने जून १८४८ मध्ये काश्मीरचा प्रश्न सोडविण्यासाठी एका आयोगाची नेमणूक केली. या आयोगाने सादर केलेल्या अहवालानुसार ५ जानेवारी १९४९ रोजी सुरक्षा परिषदेने एक महत्वपूर्ण ठराव मंजूर केला. त्यानुसार पाकिस्तान काश्मीर क्षेत्रातून आपले सैन्य त्वरीत माघारी बोलावले आणि त्यानंतर या ठरावाची अंमलबजावणी करण्यात पाकिस्तानने नकार दिल्यामुळे भारताने देखील सार्वमत घेतले नाही.[४]

काश्मीरचा प्रश्न सोडवण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेने तीन मध्यस्थ नेमले . एम.सी. नाटन, ऑवेज डिकसन आणि फ्रॅंक ग्रैहम. तथापि या तीनही मध्यस्यांचे प्रयत्न काश्मीरचा प्रश्न सोडवण्यात अपयशी ठरले. सन १९५० च्या दशकात काश्मीरचा प्रश्न सोडवण्याच्या दिशेने संयुक्त राष्ट्र संघटनेकडून अनेक ठराव मंजुर केले गेले हा प्रश्न अनेकदा सुरक्षा समितीपुढे निर्णयासाठी मांडला गेला. पाकिस्तान सिएटो आणि सेन्टो या लष्करी करारांचा सदस्य बनल्यानंतर अमेरिकेने काश्मीरच्या प्रश्नाकडे शीतयुद्धाच्या दृष्टीकोनातून पाहण्यास सुरुवात केली. परिणामी हा प्रश्न अधिक चिघळला. ऑगस्ट १९६५ मध्ये पाकिस्तानने पुन्हा एकदा काश्मीर क्षेत्रात घुसखोरी केली. या घुसखोरीचे रुपांतर पुढे भारत पाकिस्तान युद्धात झाले. २३ सप्टेंबर १९६५ ला सुरक्षा परिषदेच्या ठरावानंतर दोन्ही देशादरम्यान युद्धबंधी घडवून आणली. काश्मीर प्रश्न चर्चेच्या माध्यमातून सोडवण्यासाठी सोविएत रशियाने पुढाकार घेऊन भारत आणि पाकिस्तानला चर्चेचे निमंत्रण दिले. यानुसार ४ जानेवारी ते १० जानेवारी १९६८ दरम्यान सोविएत रशियातील ताष्कंद येथे भारत आणि पाकिस्तान दरम्यान चर्चा झाली. त्या चर्चेअंती ते निर्णय घेण्यात आले ते ताष्कंद करार म्हणून ओळखले जातात. भारतातर्फे प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांनी तर पाकिस्तान तर्फे अध्यक्ष अयुबखान यांनी करारावर स्वाक्षरी केली. ताष्कंद करारानुसार भारत आणि पाकिस्तानने काश्मीरचा प्रश्न

युद्धाद्वारे नाही तर मैत्री व सहकार्याच्या मार्गाने सोडविण्याचे मान्य केले. उभय राष्ट्रांनी आपले सैन्य मागे घेण्याचे मान्य केले. परस्परांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करण्याचे आणि परस्पर विरोधी अपप्रचार थांबविण्याचे मान्य केले.[५]

मे १९९९ मध्ये पाकिस्तानने भारतव्याप्त जम्मू व काश्मीरमधील कारगिल क्षेत्रात घुसखोरी केली. या घुसखोरांना पाकिस्तानी लष्कराचा पुर्ण पाठिंबा होता ही घुसखोरी रोखण्यासाठी भारताने त्वरीत लष्करी कारवाई केली. यालाच कारगील युद्ध असे संबोधले जाते. दरम्यान पाकिस्तानने घुसखोरांना तात्काळ माघारी बोलवावे यासाठी अमेरिकेने पाकिस्तानवर दबाव आणला. या घुसखोरीदरम्यान भारताने दाखविलेला संयम आंतरराष्ट्रीय समुदायात प्रशंसेचा विषय बनला.

काश्मीर पासून भारत वेगळा करणे हा अशा संघटनांचा प्रमुख उद्देश आहे. यासाठी ते देशांमध्ये विविध दहशतवादी कारवाया करण्यात सक्रिय असतात. पाकिस्तान दहशतवादी गटांना सहकार्य करुन त्यांना प्रशिक्षण देऊन तेथील मुस्लिम समुदायातील व्यक्तींना दहशतवादाकडे वळविण्यास प्रोत्साहन देत आहे. अशा दहशत वादांच्या संघटना भारतामध्ये घुसखोरी करुन देशात अशांतता प्रस्थापित करीत आहेत.[६] भारत सरकारवर दडपण आणण्यासाठी तसेच इतर अनेक करणांमुळे या संघटना संध्या देशभर पसरल्या असून लोकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण करीत आहेत. जम्मू व काश्मीर मधील काही दहशतवादी संघटनांची नावे पुढीलप्रमाणे १) जम्मू व काश्मीर लिबरेशन फ्रंट २) हिज्ब-उल्-मुझाहिद्दीन ३) लष्कर ए तय्यबा ४) जमात - उद- दवा.

**घुसखोरीचे परिणाम :**

**दहशतवादाचा प्रसार :** देशातील लोकांना व्हिडीओ , क्लिप्स, फोटो तसेच प्रक्षोभक , भाषणे देऊन आपल्याकडे वळवून दहशतवादी कृत्यांचा प्रसार करणे. संपूर्ण देशभर दहशतवादाचे जाळे पसरवून लोकांमध्ये इस्लाम धर्माविषयी जवळीक निर्माण करुन इतर धर्माबाबत तिरस्कार निर्माण करणे . देशांमधील विविध ठिकाणी बॉम्ब स्फोटाच्या तसेच हत्येच्या धमक्या देऊन अशांतता पसरविली जाते.

**राजकीय :** दहशतवादी कारवाया तसेच अशांतता पसरवून लोकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण करणे हे दहशतवादी संघटनाचे मुख्य कार्य आहे. त्यासाठी ते आपल्या मागण्या मांडत असून त्यामुळे राजकीय अस्थिरता निर्माण होत आहे.[७]

**आर्थिक :** भारताच्या पाकिस्तानशी तसेच इतर देशांशी असणाऱ्या परकीय व्यापारामध्ये घुसखोरीमुळे विपरीत परिणाम झाले आहेत. बेकायदेशीर आयात-निर्यात , काळा पैसा, स्थलांतर इत्यादी गोष्टीमुळे देशाच्या आर्थिक विकासामध्ये बाधा येत आहे. भारत -पाकिस्तान व्यापार संबंधामध्ये घुसखोरीमुळे सहकार्याची भावना कमी होत असून यांचे परिणाम दोन्ही देशांवर होत आहेत.

**आंतरराष्ट्रीय :** भारत व पाक यांच्यातील संबंधात तणाव निर्माण झाल्याने यांचे परिणाम संपूर्ण जगावर दिसून येतात. उदा- आर्थिक संबंध, राजकीय संबंध इत्यादी. भारत व पाक यांच्यातील युद्ध सदृश्य परिस्थिती, दहशतवाद, हिंसाचार यामुळे आंतराष्ट्रीय समुदायाला भीती वाटणे साहजिकच आहे.भारत व पाकिस्तान यांना सहकार्य करणाऱ्या देशांमध्ये थोडाफार ताण-तणाव निर्माण होतो. अण्वस्त्र कार्यक्रम, क्षेपणास्त्र कार्यक्रम यांसारख्या निरनिराळ्या धोक्यांमुळे दोन्ही देशांतील तणावपूर्ण संबंधामुळे संपूर्ण जगामध्ये भीतीचे सावट निर्माण झाले आहे.[८] संपूर्ण जग जणूकाही भीतीच्या अंधारगर्तेत ढकलले गेले आहे.

निष्कर्षतः भारत व पाकिस्तानच्या फाळणीचे घाव भरणे तर दुरच राहिले उलट काश्मीर सारख्या समस्येने फाळणीच्या घावाला सतत भडभडत ठेवले आहे. काश्मीरच्या विलीनिकरणावरुन सुरु झालेला हा वाद दोन्ही पक्षांकडून सोडविला जावूच शकणार नाही अशी परिस्थिती आहे याचे महत्वाचे कारण म्हणजे भारत व पाकिस्तान या दोन देशाची निर्मिती ज्या धार्मिक आधारावर झाली त्या आधाराचे पाकिस्तानकडून सतत केले जाणारे राजकारण आणि जम्मू-काश्मीरचे विलीनीकरण करुन घेतल्यानंतर भारत सरकारने येथील विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूका व घटनात्मकदृष्ट्या भारतीय संघराज्याचे एक घटक राज्य म्हणून स्थापन झालेले राज्य सरकार या पार्श्वभुमीवर सार्वमत कालबाह्य ठरले. अशी परिस्थिती असतांना काश्मीरवाद सोडविणे हे भारत व पाकिस्तानच्या दृष्टीने व्दिपक्षीय संबंधातील सर्वात महत्वाचा मुद्दा ठरतो. यासाठी दोन्ही पक्षांकडून राजकीय पूर्वग्रह दुषितता दूर ठेवून चर्चेव्दारे काश्मीरी जनतेच्या भल्याचा तोडगा काढणे गरजेचे आहे.

**संदर्भ सूची :**


१) देवळाणकर शैलेंद्र, भारतीय परराष्ट्र धोरण : सातत्य आणि स्थित्यंतर, प्रतिमा प्रकाशन, पुणे, आवृत्ती २०१०, पृ. १५९.
२) उपरोक्त.
३) युनिक बुलेटिन, डिसेंबर २०१३, पृ. ११
४) देवळाणकर शैलेंद्र, भारतीय परराष्ट्र धोरण : सातत्य आणि स्थित्यंतर, प्रतिमा प्रकाशन, पुणे, आवृत्ती २०१०, पृ. १५९.
५) उपरोक्त, पृ. १६०.
६) युनिक बुलेटिन, डिसेंबर २०१३, पृ. १२
७) उपरोक्त, पृ. १३
८) उपरोक्त.